# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक :- एमएफपी-३५१९/सीआर-५५/२०१८/तीन                                        दिनांक :- १९ जुलै, २०१९.

## घोषणा

**विषय:- महाराष्ट्र वन सेवा परीक्षा - २०१९ -- प्रवर्गनिहाय पदसंख्येतील बदलाबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २६ मे, २०१९ रोजी आयोजित **महाराष्ट्र वन सेवा पूर्व परीक्षा-२०१९** करीता दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये शासनाच्या मागणीनुसार सहायक वन संरक्षक, गट-अ व वनक्षेत्रपाल, गट-ब संवर्गातील एकूण १०० पदांचा समावेश करण्यात आला होता. तसेच, जाहिरातीमध्ये नमूद संवर्गातील पदसंख्या व आरक्षणात बदल झाल्यास त्याचा समावेश मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेत करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले होते.

**२.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.५८१ए/१६-ब, दिनांक ४ जुलै, २०१९ अन्वये राज्य शासनाच्या सेवेतील विविध पदांवरील भरतीकरीता सुधारित बिंदुनामावली विहित करण्यात आली असल्याने तसेच, शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.६३१ए/१६-ब, दिनांक ४ जुलै, २०१९ अन्वये जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर प्रकरणातील मा.उच्च न्यायालयाचे दिनांक २७ जून, २०१९ रोजीचे आदेश विचारात घेवून सरळसेवा भरतीमध्ये १३% आरक्षणानुसार सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता आरक्षण निश्चिती करुन पद भरतीची कार्यवाही करण्यात यावी, असे शासनाकडून आदेश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने शासनाकडून दिनांक १८ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रादवारे विषयांकित महाराष्ट्र वन सेवा परीक्षेमधून भरावयाच्या पदांचे सुधारित मागणीपत्र प्राप्त झाले असून त्यानुसार विषयांकित महाराष्ट्र वन सेवा परीक्षा- २०१९ मधून भरावयाच्या एकूण १०० पदांचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| **(१) सहायक वन संरक्षक, गट-अ (एकूण २९ पदे)** | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **सा. व शै. मागासवर्ग** | **आ.दु.घ.** | **एकूण मागासवर्गीय** | **खुला** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | ४ | -- | -- | १ | १+१* | १ | २ | १+१* | ४ | ३ | १९ | १० | २९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३ | -- | -- | १ | १ | १ | १ | १ | ३ | २ | १३ | ६ | १९ |
| महिला | १ | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | १ | १ | ६ | ३ | ९ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(२) वनक्षेत्रपाल, गट-ब (एकूण ७१ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ५+५* | ५ | १ | १* | ८ | २+१* | १०+४* | २ | ९ | ७ | ६० | ११ | ७१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ५ | ३ | १ | १ | ६ | २ | ८ | १ | ४ | ५ | ३६ | ५ | ४१ |
| महिला | ३ | २ | -- | -- | २ | १ | ४ | १ | ३ | २ | १८ | ३ | २१ |
| खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | १ | ४ |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| वनशास्त्र पदवीधारक | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | १ | ४ |
| *** अनुशेषाची पदे** | | | | | | | | | | | | | |

**३ .** वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१९ मधून भरावयाच्या एकूण १०० पदांकरीता मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

ठिकाण :- मुंबई

उप सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.